MHNG130012482022

Judge Code: MH03211

खटला दाखल तारीख : १४/१०/२०२२.
खटला नोंदणी तारीख : १४/१०/२०२२.
निकालाची तारीख : ०२/०५/२०२६.
कालावधी : ०३ वर्ष ०६ महिने १९ दिवस

**भाग – अ**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय रामटेक, जिल्हा नागपुर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती ए. ए. शिरवळकर)**

**नियमित फौजदारी खटला क्रं. १०९/२०२२** **निशाणी क्रमांक–७३.**
**(जुना संक्षीप्त फौजदारी खटला क्रं. १४००६४८/२०१३)**

**(पोलीस स्टेशन – रामटेक येथील गुन्हा नोंद क्रं. ३०५०/२०१३ जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३, ७ अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/फिर्यादी** | | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, रामटेक,<br>ता.रामटेक, जि नागपुर. |
| **सादरकर्ते** | | सहायक सरकारी अभियोक्ता<br>श्री. एम. आर. भांडेकर |
| **आरोपी** | | **१] रितेश दयाराम साखरे**<br>वय – ३१ वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हर,<br>रा. विनोबा भावे वार्ड, ता. रामटेक,<br>जि. नागपूर.<br>**२] शेख ताजू शेख यासीन**<br>वय – ३१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. शिवाजी वार्ड, ता. रामटेक, नागपूर. |

| | | |
|---|---|---|
| | | **३] राजकुमार हरीभाऊ गायकवाड**<br>वय – ५३ वर्षे, व्यवसाय – व्यापार,<br>रा. शितलवाडी, ता. रामटेक, जि. नागपूर |
| **सादरकर्ते** | | ॲड. श्री. एम. व्ही. येरपुडे |

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १२.०९.२०१३ |
| फिर्याद दाखल तारीख | १२.०९.२०१३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २७.१२.२०१३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १६.०९.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ३०.१०.२०२३ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| निकालाची तारीख | ०२.०५.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर. | ... |

| आरोपीचा अनु.**क्रं.** | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्र.संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **रितेश दयाराम साखरे** | १२.०९.२०१३ | १३.०९.२०१३ | जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ अन्वये | निर्दोष मुक्त | .. | .. |
| २. | **शेख ताजू शेख यासीन** | १२.०९.२०१३ | १३.०९.२०१३ | | | .. | .. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ अन्वये | निर्दोष मुक्त | | |
| ३. | **राजकुमार हरीभाऊ गायकवाड** | १५.१०.२०१३ | १५.१०.२०१३ | | | .. | .. |

# न्यायनिर्णय
## (घोषित तारीखः– ०२ मे, २०२६)

आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द सदरचा खटला जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ अन्वये दंडनीय अपराधांकरीता चालविण्यात आला.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :–

२) दि. १२/०९/२०१३ रोजी मुखबिरद्वारे विश्वसनिय बातमी प्राप्त झाली की, ग्राम परसोडा शितलवाडी येथील आरोपी क्र. ३ राजकुमार गायकवाड याचे विद्यासागर कॉलेज शितलवाडी जवळील रॉकेल शॉप समोरील ठेवलेले दोन मोठे लोखंडी ड्रम प्रत्येकी २००×२०० लीटर रॉकेलची शॉप मालक गायकवाड हा अफरातफर करीत आहे. तसेच त्याठिकाणी ड्रम ठेवण्यास महिंद्रा पिकअप क्र. MH-31-CB-3932 लागलेली आहे. अशा माहितीवरून पोलीस उपनिरीक्षक एम. एम. पराते, स्टाफ व पंच असे मिळून आरोपी क्र. ३ याच्या रॉकेल शॉपजवळ पोहोचताच सदर वाहन तेथून निघून मौदा–रामटेक गावाकडे भरधाव वेगाने निघून गेले. सदर गाडीचा पाठलाग करून गाडीस थांबवले व सदर गाडीचे चालक व मालक यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रितेश साखरे व शेख ताजू शेख यासीन असे सांगितले. त्यानंतर सदर गाडीची पाहणी केली असता गाडीच्या डाल्यामध्ये दोन लोखंडी ड्रम प्रत्येकी २००×२०० लीटर रॉकेल भरलेले असा किंमत रु. ८,०००/– दिसून आले. रॉकेलबाबत विचारपूस केली असता गायकवाड यांचे रॉकेल शॉपमधून त्यांचे सोबत असलेल्या गाडीमध्ये दोन्ही ड्रम ठेवले. तसेच आरोपींनी रॉकेलबाबत कोणतेही कागदपत्रे दाखवले नाहीत. सदर आरोपी हे रॉकेलची काळा बाजारी

करतांना मिळून आल्याने महिंद्रा गाडी रू. २,००,०००/- व रॉकेल किंमत रू. ८,०००/- असा एकूण किंमत रू. २,०८,०००/- असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच आरोपींवर कार्यवाही होणेस रामटेक पोलीस स्टेशन येथे आरोपी क्र. १ ते ३ विरुद्ध फिर्याद दाखल आहे.

३) फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०५०/२०१३ रामटेक पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आला. एम. एम. पराते यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा करून २००×२०० लीटर रॉकेलने भरलेले दोन लोखंडी ड्रम व महिंद्रा पिकअप गाडी जप्त केले. साक्षीदारांचे बयान नोंदविण्यात आले. आरोपींना अटक केली. त्यानंतर त्यांनी न्यायालयात आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक १६/०९/२०२२ रोजी आरोपी हे न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांचे विरुध्द निशाणी क्र. ४६ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींनी गुन्हा नाकबुल केला व खटला चालविण्याची विनंती केली.

५) आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ संतोष रामचंद्र हटवार (घटनास्थळ पंच) निशाणी क्र. ५७ व साक्षीदार क्र. २ सुशांत गुलाब धमगाये (घटनास्थळ पंच) निशाणी क्र. ६३ वर तपासले आहे.

६) आरोपी क्र. १ ते ३ चे फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये स्पष्टीकरण नोंदविण्यासाठी पुरेसा पुरावा न्यायालयाच्या पटलावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींचे निवेदन नोंदविलेले नाही.

७) अभियोग पक्षातर्फे वकील श्री. एम. आर. भांडेकर व आरोपी तर्फे वकील श्री. एम. व्ही. येरपुडे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

८) अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा व आरोपींचा बचाव लक्षात घेता प्रस्तुत

खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात सदर मुद्दे, त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा याप्रमाणेः–

| अ.क्र | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १२/०९/२०१३ रोजी १९.४५ वाजण्याच्या सुमारास एस.टी. बसस्टॉप जवळ, रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर येथे आरोपी क्र. १ ते ३ यांनी अवैधरित्या एकूण ४०० लीटर रॉकेलचा साठा केला. त्यामुळे त्यांनी जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३, ७ अन्वये गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**अभियोग पक्ष निशाणी क्र. ५८ वरील सुचनापत्रावरील सही, निशाणी क्र. ५९ वरील घटनास्थळ पंचनाम्यावरील सही, निशाणी क्र. ६० वरील सील उघडण्याचा पंचनाम्यावरील सही, निशाणी क्र. ६१ वरील जप्तीपत्रकावरील सही इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

## :: का र ण मि मां सा ::

**मुद्दा क्र. १ करीता** :–

९) दिनांक १२/०९/२०१३ रोजी एस. टी. बस स्टॉप, रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर येथे आरोपी क्र. १ ते ३ यांनी अवैधरित्या ४०० लीटर रॉकेलचा साठा बाळगला, हे सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने अभिलेखावरील साक्षीदार तपासले आहेत.

१०) अभियोग पक्षाच्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळण्यापुर्वी मी

याठिकाणी अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा नमुद करीत आहे. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ संतोष रामचंद्र हटवार याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, दि. १२/९/२०१३ रोजी पोलीसांनी त्याला बोलवले असल्याचे त्याला आठवत नाही. पोलीसांनी त्याच्यासमक्ष कोणतीही जप्तीची कारवाई केली नव्हती. तसेच दि. १६/९/२०१३ रोजी नि.क्र. ६० वरील सील उघडण्याचा पंचनामा व जप्ती पंचनाम्याची कारवाई केली नव्हती. सदर साक्षीदारास नि.क्र. ५८ वरील सुचनापत्र, नि.क्र ५९ वरील घटनास्थळ पंचनामा व नि.क्र. ६१ वरील जप्तीपत्रक दाखवले असता त्यावर त्याची सही आहे परंतु त्यातील मजकुराविषयी त्याला माहित नसल्याचे त्याने सांगितले आहे.

११) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ सुशांत गुलाब धमगाये हा देखील पुन्हा साक्षीदार क्र. १ याने सांगीतल्याप्रमाणेच न्यायालयाच्या पुढे सांगत असल्याने त्याचा ऊहापोह करण्याचे मी टाळले आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र. १ व २ यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतु, सदर साक्षीदारांनी त्यानंतर देखील अभियोग पक्षास साहाय्य होईल, असे कोणतेही तथ्य अथवा कोणताही पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. अभियोग पक्षाचा साक्षीदार यांच्या साक्षीतून घटनास्थळ पंचनामा, सील उघडण्याचा पंचनामा व जप्तीपत्रक सिद्ध झालेले नाही.

१२) अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एम. आर. भांडेकर व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम. व्ही. येरपुडे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावरील लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. निशाणी क्र. ५९ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ६० वरील सील उघडण्याचा पंचनामा व निशाणी क्र. ६१ वरील जप्तीपत्रक यातील मजकुर न्यायालयापुढे सिद्ध करण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे. साक्षीदार क्र. १ व २ हे सदर खटल्यात घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच म्हणून देखील अभियोग पक्षाने तपासलेले आहेत. परंतु सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नाही. तसेच अभियोग पक्ष तपासीक अधिकारी व इतर स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदवू शकलेला नाही. सदर गुन्ह्यातील

जप्ती किंवा तपास प्रक्रियेत स्वतंत्र पंचांची साक्ष विश्वसनीय नाही. जप्तीची कारवाई संशयास्पद ठरते. तसेच आरोपीकडे परवाना होता किंवा साठा कायदेशीर मर्यादित होता याबाबत देखील अभियोग पक्षाने स्पष्ट नोंद सादर केलेली नाही. यावरून वर नमुद कायद्याअंतर्गत आवश्यक घटक सिद्ध करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरलेला आहे. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ यांच्याकडे ४०० लीटर रॉकेलचा साठा आढळून आला, ही बाब सरकार पक्षाने संशयापलीकडे सिद्ध केलेली नाही. सदर गुन्ह्यातील महिंद्रा पिकअप क्र. MH-31-CB-3932 या गाडीतील जप्त मुद्देमाल ४०० लीटर केरोसीन हे शिधापत्रीका धारकांना मा. तहसिलदार रामटेक यांचे आदेश क्र. अका/अन्न/तह-राम/कावि/२८५/२०१३, दि. १३ नोव्हेंबर, २०१३ अन्वये केरोसिन परवानाधारक यांना देण्यात आलेले आहे. केरोसीन साठ्याची विल्हेवाट करण्याचा पंचनामा देखील अभिलेखावर दाखल केलेला आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता आरोपींना सदर गुन्ह्यात दोषी धरता येणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** :-

१३) मुद्दा क्र. १ वरील चर्चेअंती मी या मतास आले आहे की, आरोपी क्र. १ ते ३ विरुद्ध निशाणी क्र. ४६ वर ठेवलेल्या जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ अन्वये दोषारोप अभियोग पक्षाने संशयाचे पलीकडे जाऊन आरोपींविरुध्द सिध्द केलेला नाही. म्हणून मी मुद्दा क्र. २ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## -: <u>आ दे श</u> :-

(१) आरोपी **१] रितेश दयाराम साखरे २] शेख ताजू शेख यासीन ३] राजकुमार हरीभाऊ गायकवाड** यांना जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ३ व ७ या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रीया संहिता चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येते.

(३) जप्त मुद्देमाल महिंद्रा पिकअप क्र. MH-31-CB-3932 ही आदेशान्वये

सुपुर्तनाम्यावर दिलेली आहे. अपील कालावधी संपल्यानंतर सदर गाडी ही मालकाने त्याच्याच ताब्यात ठेवावी.

(४) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे, या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्यांची उपस्थितीची हमी म्हणून प्रत्येकी रु. १५,०००/– रकमेची जामीन द्यावा. आरोपींनी दिलेली जामीन आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

AMRUTA AVINASH SHIRVALKAR

Digitally signed by AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Date: 2026.05.02 15:09:53 +0530

रामटेक.
दिनांक : ०२/०५/२०२६.

(ए. ए. शिरवळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक.

# भाग – क

## सरकारपक्षाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | संतोष रामचंद्र हटवार | घटनास्थळ जप्ती पंच |
| २. | सुशांत गुलाब धमगाये | घटनास्थळ जप्ती पंच |

## सरकारपक्षाचा कागदोपत्री पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| .. | .. | .. |

## बचावपक्षाचे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| .. | .. | .. |

## न्यायालयाने दिलेले निशानी क्रमांक

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | .. | .. |

## जप्त मुद्देमाल

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | .. | .. |

AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Digitally signed by AMRUTA AVINASH SHIRVALKAR
Date: 2026.05.02 15:09:58 +0530

रामटेक.
दिनांक : ०२/०५/२०२६.

(ए. ए. शिरवळकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक.

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 02/05/2026. |
| Judgment dictated on | : | 02/05/2026. |
| Transcription ready on | : | 02/05/2026. |
| Judgment checked and signed on | : | 02/05/2026. |

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are word to word, as per original judgment.

P. C. Nandanwar
(Stenographer Gr. III)